**महाराष्ट्र विकास सेवा गट-अ व गट-ब मधील अधिकाऱ्यांच्या पदस्थापना, बदली याबाबत सक्षम प्राधिकाऱ्यास शिफारस करण्यासाठीच्या नागरी सेवा मंडळ (१) च्या बैठकीबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक : मविसे-१०१७/प्र.क्र.१६९/२०१७/आस्था-३,**
बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, मुंबई - ४०० ००१.
तारीख : १६ ऑगस्ट, २०१७.

**संदर्भ :-** १) शासन निर्णय, ग्राम विकास विभाग क्रमांक : मविसे-१०१४/प्र.क्र.४६/२०१४/आस्था-३, दिनांक ०५.०५.२०१५.
२) शासन निर्णय, ग्राम विकास विभाग क्रमांक : मविसे-१०१७/प्र.क्र.३५/२०१७/आस्था-३अ, दिनांक १२.०५.२०१७.

**प्रस्तावना :-**

ग्राम विकास विभागाच्या नियंत्रणाखालील महाराष्ट्र विकास सेवा गट-अ आणि गट-ब संवर्गातील अधिकाऱ्यांच्या बदली व पदस्थापना याबाबत सक्षम प्राधिकाऱ्यास शिफारशी करण्यासाठी अनुक्रमे संदर्भ क्र.१ व २ च्या शासन निर्णयान्वये नागरी सेवा मंडळ (१) ची स्थापना करण्यात आलेली आहे. त्यानुसार, महाराष्ट्र विकास सेवा गट-अ व ब मधील अधिकाऱ्यांची सरळसेवा/पदोन्नतीने नियुक्ती तसेच सर्वसाधारण/विनंती/मुदतपुर्व बदलीने पदस्थापना करतेवेळी सक्षम प्राधिकाऱ्यास शिफारशी करण्यासाठी नागरी सेवा मंडळ (१) ची बैठक आयोजित केली जाते. परंतु, क्षेत्रिय स्तरावरील महाराष्ट्र विकास सेवा गट-अ व ब मधील अधिकाऱ्यांना सदर बैठकांबाबत माहिती होत नाही. त्यामुळे त्यांना नागरी सेवा मंडळाच्या बैठकीदरम्यान बदली/पदस्थापनेसाठी अर्ज सादर करता येत नाहीत. ही बाब विचारात घेता, नागरी सेवा मंडळाच्या बैठकीबाबतची पुर्वसूचना महाराष्ट्र विकास सेवेतील सर्व अधिकाऱ्यांना देणे शासनाच्या विचाराधीन होते.

**शासन परिपत्रक:-**

महाराष्ट्र विकास सेवा गट-अ व ब मधील अधिकाऱ्यांच्या बदली करीता वर्षातून तीन वेळा नागरी सेवा मंडळाची बैठक बोलाविण्यात येईल व अशी बैठक सर्वसाधारणपणे अनुक्रमे एप्रिल, ऑगस्ट आणि नोव्हेंबर या महिन्यांमध्ये आयोजित करण्यात येईल. केवळ काही विशेष कारणांसाठी जसे की, निलंबनानंतर पुनर्स्थापनेची पदस्थापना, न्यायालयीन आदेश, सेवानिवृत्तीमुळे होणारी मोठ्या

प्रमाणावरील रिक्तता इत्यादी व अन्य तातडीच्या प्रसंगी नागरी सेवा मंडळाची विशेष बैठक आयोजित करण्यात येईल. नागरी सेवा मंडळाच्या एप्रिल, ऑगस्ट आणि नोव्हेंबर मधील बैठकांच्या दिनांकाबाबत अग्रिम सूचना विभागाच्या rdd.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. सदर सूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ७ दिवसात महाराष्ट्र विकास सेवा संवर्गातील बदलीसाठी इच्छूक असलेल्या संबंधित अधिकाऱ्यांनी याकरिता विहीत करण्यात आलेल्या प्रपत्रात बदलीसाठीचे कारण विषद करुन असे अर्ज vijayd.shinde71@nic.in या ईमेलवर सादर करणे आवश्यक आहे. सदर मुदतीनंतर आलेल्या अर्जांचा विचार करण्यात येणार नाही.

२. बदल्यांकरिता जे अधिकारी राजकीय व्यक्तींची पत्रे आणतील किंवा इतर प्रकारे दबाव आणतील अशा अधिकाऱ्यांविरोधात शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल. तसेच अशा प्रकरणांची संबंधित अधिकाऱ्यांच्या गोपनीय अहवालात नोंद घेण्यात येईल.

३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१७०८१६१६४८०९९१२० असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Vijay Dattatraya Shinde

Digitally signed by Vijay Dattatraya Shinde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=RDD, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=fabf0ce38fdf553beb949764920592a97832b6399cb7060200d032e127e455f1, cn=Vijay Dattatraya Shinde
Date: 2017.08.16 16:55:25 +05'30'

( वि.द. शिंदे )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) विभागीय आयुक्त (सर्व विभागीय आयुक्त कार्यालये),
२) मुख्य कार्यकारी अधिकारी (सर्व जिल्हा परिषदा)
३) उप आयुक्त (आस्थापना) (सर्व विभागीय आयुक्त कार्यालये), यांना विनंती करण्यात येते की त्यांनी सदर परिपत्रक म.वि.से. संवर्गातील सर्व अधिकाऱ्यांच्या निदर्शनास कृपया आणावे.
४) संबंधित अधिकारी,
५) निवड नस्ती.

शासन परिपत्रक क्र.मविसे-१०१७/प्र.क्र.१६९/२०१७/आस्था-३, दिनांक १६.८.२०१७ सोबतचे प्रपत्र

## महाराष्ट्र विकास सेवा संवर्गातील अधिकाऱ्यांनी बदली करिता नागरी सेवा मंडळाच्या बैठकीसाठी सादर करावयाचे प्रपत्र

1] अधिकाऱ्याचे नाव : ______________________

2] जन्म दिनांक : ______________________

3] सेवानिवृत्तीचा दिनांक : ______________________

4] सेवार्थ आयडी क्र.(असल्यास) : ______________________

5] स्वजिल्हा व स्वग्राम : ______________________

6] कायमचा पत्ता : ______________________

______________________

7] सध्याची वेतनश्रेणी : __________+ ग्रेड पे

8] सध्या कार्यरत असलेल्या पदाची माहिती :-

सध्याचे पदनाम : ______________________

भ्रमणध्वनी क्र. : ______________________

ई-मेल (वैयक्तिक) : ______________________

9] बदली पाहिजे असलेले पद

| अ.क्र. | बदली पाहिजे असलेले पद | जिल्हा | विभाग |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |

10] बदलीचे कारण ______________________

______________________

11] सेवा तपशील (सध्याच्या पदापासून सुरुवात) (रजेचा तपशील देऊ नये)

| अ.क्र. | धारण केलेल्या पदाचे नाव | जिल्हा | विभाग | कालावधी |
|---|---|---|---|---|
| 1. | | | | |
| 2. | | | | |
| 3. | | | | |
| 4. | | | | |
| 5. | | | | |

12] इतर अधिक माहिती (असल्यास) :______________________

(अधिकाऱ्याचे नाव व स्वाक्षरी)



RURAL DEVELOPMENT DEPARTMENT